CNR No. :- MHSI100001902021

## -: नियमित दिवाणी मुकदमा क्र. १९/२०२१ :-
## -: निशाणी ५६ वरील आदेश :-

वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात व दावा नोंदवहीमध्ये दुरुस्ती होऊन मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, सदर कामातील वादी क्र. ४ अरुणा राजशेखर गाडवी यांचे दि.१५.०१.२०२५ रोजी नाशीक येथे निधन झाले व त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत :-

४अ. सौ. पुजा विशाल थोरात (मुलगी)
रा. मु.पो.नूल, निलजी रोड,
ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर
पिन कोड ४१६ ५५१
सध्या रा. नाशिक,

४ब. श्री. राजशेखर कल्लाप्पा गाडवी (पती)
रा. नेवडे गल्ली, व्ही.टी.सी. गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर, पिन कोड ४१६ ५०२

मयतास वरीलप्रमाणे वारस असुन अन्य कोणीही वारस नाहीत. सदरचे वारस कायद्याने ठरवुन दिलेल्या मुदतीत दाखल करीत असल्याने तशी दुरुस्ती मुळ दाव्यात करण्यास परवानगी मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाकामी प्रतिवादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन त्यांची अर्ज मंजुरीस हरकत नसल्याचे

कथन केले आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दाव्याचे स्वरुप पाहता वादी मागत असलेली दुरुस्ती दावा गुणदोषावर निकाली करणेकरीता महत्वाची असल्याचे दिसून येते. वादीने सदरची दुरुस्ती ही विहीत मुदतीत मागितलेली आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांनी देखील अर्ज मंजुरीस कोणताही आक्षेप नोंदविलेला नाही. वादी मागत असलेल्या दुरुस्तीमुळे दावा परीणामकारकरीत्या निकाली करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. सबब खर्चाबाबत कोणताही आदेश पारीत न करता अर्ज मंजुर करणे न्यायोचित राहील. सबब, खालीलप्रमाणे पारीत करण्यात येत आहे.

**–:: आदेश ::–**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यात दुरुस्ती केल्यावर तशी दावा दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2025.08.20 15:58:13 +0530

ठिकाण – दोडामार्ग.
दिनांक – २०.०८.२०२५.

(वाय. पी. बांवकर)
दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
दोडामार्ग.